# सोमनाथ लांडगे यांचा आज नागरी सत्कार

खेड-शिवापूर, दि. १९ (वा. वा.) खेड-शिवापूर डोणजे मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ शंकरराव लांडगे यांच्या ३६ व्या वाढदिवसानिमित्त सोमनाथ लांडगे सत्कार समितीच्या वतीने त्यांचा दि. २० रोजी जाहीर नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

यानिमित्ताने मतदारसंघात खाउलाटन, शिवापूर येथे सर्व रोगनिदान शिबिर, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येणार आहे. लांडगे यांचा नागरी सत्कार शिवसेना जिल्हा प्रमुख अविनाश राहणे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी जिल्हाप्रमुख राजाभाऊ रायकर, हवेली-मुळशी निरीक्षक सुनील जगताप, सामाजिक कार्यकर्ते सुचित कोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी नगरसेवक अप्पा दांगट, शिवसेना हवेली तालुकाप्रमुख व जि. प. सदस्य नामदेव ताकै, माजी सदस्य विलास मते, पं. स. सदस्य बापूसाहेब चव्हाण, मुळशी पं. स. सभापती अशोक कुडले, उपसभापती भानुदास पानसरे, वेल्ह्याचे सभापती सुरेश निबाळकर, मुळशी तालुकाप्रमुख शरद कमाले, भोर तालुकाप्रमुख संदीप बांदल, वेल्हा तालुकाप्रमुख भरत जिन्हाळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर जादूगार ईश्वर यांचे जादूचे प्रयोग होणार आहेत, अशी माहिती सत्कार समितीचे अध्यक्ष प्रमोद गायकवाड आणि हवेली तालुका उपप्रमुख व सत्कार समितीचे कार्याध्यक्ष रमेश कोंडे यांनी दिली.

# कोंढणपूर रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मागणी

खेड शिवापूर, दि. १ (वार्ताहर) : खेड शिवापूर ते कोंढणपूरदरम्यानच्या रस्त्यावर पावसामुळे खड्डे पडले असून, ते खड्डे बुजवून रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी येथील शिवसेनेचे कार्यकर्ते श्री. रमेश कोंडे यांनी केली आहे.

खेड शिवापूर ते कोंढणपूर व पुढे कल्याण हा रस्ता पुणे-सातारा महामार्गाला जोडलेला असून, शिवगंगा खोऱ्यातील हा प्रमुख रस्ता आहे. खेड शिवापूर, श्रीरामनगर, शिवापूर, कुसगाव, रांजे, आर्वी-सणसवाडी, कोंढणपूर-रहाटवडे, कल्याण-मोरदरी, अवसरवाडी मार्गे सिंहगड किल्ला पुढे डोणजेमार्गे पानशेत किंवा पुणे असा हा प्रमुख मार्ग असून, हवेली, भोर, पुरंदर या तीन तालुक्यांना जोडणारा हा रस्ता आहे.

तीर्थक्षेत्र कोंढणपूर येथील ऐतिहासिक जागृत तुकाईदेवीचे देवस्थान असून, आठवड्यातील मंगळवार, शुक्रवार, अमावस्या, पौर्णिमा यादिवशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक देवदर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर येत असतात. या परिसरात लहान-मोठे कारखाने असल्याने वाहनांची सतत वर्दळ असते. दरम्यानचा रस्ता अरुंद असल्याने समोरासमोर येणाऱ्या वाहनांना कच्च्या रस्त्यावर उतरावे लागते.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.